# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०१/०१/२०१९

## ग्रामीण पोलीसांची ३१ डिसेंबरला रात्री उशिरापर्यंत कारवाई

---

सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करातांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये यासाठी ग्रामीण पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे जिल्हयातील **४० पोलीस ठाणे** निहाय बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हयातील महामार्ग, वर्दळीचे ठिकाणे, चेक पोस्ट इ. ठिकाणांवर बॅरिकेटस् लावुन सतर्क नाकाबंदी करण्यात आली होती. ड्रंक अॅन्ड ड्राईव्हवर लगाम लावण्यासाठी ब्रिथ अॅनालायझर मशिन सज्ज ठेवण्यात आले होते, तसेच हॉटेल्स, ढाबे, रिसॉर्ट या ठिकाणांवर फिक्स पॉईंट लावुन वाहतुक कोंडी आणि सुरक्षात्मक योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात आली. याशिवाय महामार्ग व रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने सतर्क पेट्रोलिंग ठेवण्यात आली होती. तसेच महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस व दामिनी पथक तैनात करण्यात आले होते.

नाशिक ग्रामीण जिल्हयातील मालेगाव विभागासाठी बंदोबस्त प्रभारी म्हणुन अपर पोलीस अधीक्षक **श्री. निलोत्पल सो.** यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात सतर्क बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंदोबस्त दरम्यान जिल्हयातील विविध पर्यटन स्थळे, रिसॉर्ट, हॉटेल्स्, ढाबे, मॉलस् इ. परिसरात करडी नजर ठेवण्यात आली आली होती. जिल्हयातील महामार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणांवर लावण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान प्रत्येक वाहन चालकाची ब्रेथ अॅनालायझरव्दारे तपासणी करण्यात आली, रात्री उशिरापर्यंत पथकांकडुन ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह ची कारवाई सुरू होती. तसेच अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुक करणारे आणि मद्य प्राशन करून बेधुंद अवस्थेत मस्ती करणारे इसमांवरही दारूबंदी कायदयान्वये कारवाई करण्यात आली.

सदर कारवाईत जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक गुन्हे शाखा, जिल्हा वाहतुक शाखा व शहर वाहतुक शाखा मालेगाव अशा पथकांनी ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह तसेच बेदरकारपणे वाहने चालविणारे इसमांवर एकुण ८८ केसेस करून सुमारे १७,२००/- रू.चा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुक करणारे १५ इसमांवर कारवाई करून दारूबंदी कायदयान्वये १३ केसेस दाखल करण्यात आलेल्या आहे, त्यात ७४,४४८ रू. किं.चा अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला. तसेच ०८ जुगारी इसमांवर कारवाई करून मुंबई जुगारबंदी कायद्यान्वये ०४ केसेस दाखल करण्यात आल्या असुन ६३,०१०/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.